ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, १५ एप्रिल, १९७० | अंक ८



# विविध माहिती

**निर्गतीत वाढ** – जानेवारी अखेरच्या १९६९–७० च्या पहिल्या १० महिन्यांत भारताची निर्गत १,१८५ कोटी रु. ची झाली आणि आयात १,२५३ कोटी रु. ची झाली. तीन-चार महिन्यांत तर आयातीपेक्षा निर्गत अधिक झाली. १९६८–६९चे मानाने १९६९–७० मध्ये निर्यातीत ४·३ ते ४·५% वाढ झालेली असेल.

**बँक राष्ट्रीयीकरण कायद्यास राष्ट्रपतींची मंजुरी**–बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या नव्या कायद्यास राष्ट्रपतींनी मंजुरी दिली आहे. त्या अन्वये १४ बँक कंपन्यांना ८७·४० कोटी रु. नुकसान भरपाई मिळेल

**आंब्यांची निर्गत**–१९६६–६७ मध्ये भारतातून ८१० टन आंब्यांची निर्गत झाली होती; १९६८–६९ मध्ये ती १,२०४ टनांवर गेली. आपल्या आंब्यांचे मुख्य खरेदीदार कुवेत, बेहरिन, ब्रिटन, मलेशिया, सिंगापूर आणि फ्रान्स हे देश आहेत.

**फुटबॉल शौकीनांचा मेक्सिकोला विमान प्रवास**— ग्रेट ब्रिटनमधील ३,००० फुटबॉल शौकीन येत्या जूनमध्ये जागतिक फुटबॉल सामने पाहण्यासाठी मेक्सिकोला जेट विमानाने जाणार आहेत. प्रवास खर्च, होटेल खर्च आणि सामन्यांची प्रवेशपत्रिका ह्यांसाठी प्रत्येकास ८,००० रुपये खर्च येईल.

**पोस्टाच्या तिकिटास ६० लक्ष रु. मिळाले**— ब्रिटिश ग्वायनामध्ये १८५६ साली छापलेले, जगातील दुर्मिळातील दुर्मिळ पोस्टाचे तिकीट नुकतेच ६० लक्ष रुपयांना विकले गेले. तिकिटाच्या किंमतीचा हा जागतिक विक्रम आहे.

**स्कूटरसाठी प्रचंड क्यू**—१९६९अखेर एकूण २,४९,२९९ स्कूटर्ससाठी व्यापाऱ्यांकडे मागणी नोंदविलेली आहे. त्यांपैकी १,६६,९९७ व्हेस्पांसाठी आणि ८२,३०२ लँब्रेटांसाठी मागणी आहे.

**३१·३७ लक्ष रु. च्या मालाची चोरी**–एकूण ३१·३७ लक्ष रु. किमतीचा रेल्वेच्या मालकीचा माल १९६९ मध्ये चोरीस गेला.

**ठेवींच्या विमासंरक्षणात वाढ**— व्यापारी बँकांकडील जनतेच्या ठेवींची हमी सरकारी मालकीची डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन घेते. प्रारंभी त्या हमीची मर्यादा १,५०० रु. होती, ती जानेवारी, १९६८ मध्ये ५,००० रु. वर नेण्यात आली. १ एप्रिल, १९७० पासून ती १०,००० रु. करण्यात आली आहे. बँकांनी त्यासाठी द्यावयाच्या हप्त्यांत ( दर १०० रु. च्या ठेवीस ५ पैसे ) वाढ केलेली नाही.

**मुंबईमधील टेलिव्हिजन केंद्र** — मुंबई आणि श्रीनगर येथील टेलिव्हिजन केंद्रे अनुक्रमे १९७१ आणि १९७२ अखेर सुरू होतील. मुंबई केंद्र, आकाशवाणीच्या वरळी येथील जागी स्थापन केले जाईल. ४५ ते ८० किलोमीटर्सची त्याची कक्षा असेल. सर्वच बृहन्‌मुंबईत त्याचे कार्यक्रम पाहता येतील.

**देवदेवतांच्या मूर्तींचा व्यापार** — दिल्लीमधील एका दुकानातून पोलिसांनी सुमारे १ लक्ष रुपये किंमतीच्या मूर्ती आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. वेगवेगळ्या देवळांतून चोरलेल्या ह्या मूर्ती आहेत. बुद्धाच्या आणि जैन स्वामींच्या मूर्तींचा त्यात मोठाभरणा आहे.

**पश्चिम जर्मनीला मद्याची निर्यात**— म्हैसूरमधून सोम नामक मद्याच्या १०० पेट्या पश्चिम जर्मनीला निर्यात करण्यात आल्या. पश्चिम जर्मनीला भारतामधून मद्य निर्यात होण्याची ही पहिलीच वेळ आहे. म्हैसूरमधील एका कंपनीने तयार केलेल्या ह्या मद्यात काही वनस्पतींचा अर्क, अल्कोहोल आणि मध ह्यांचा उपयोग केलेला आहे.

**मॅनेजिंग एजन्सी इतिहासजमा** — मॅनेजिंग एजन्सी पद्धत, कंपनी कायद्यात केलेल्या दुरुस्तीनुसार, ३ एप्रिलपासून बंद झाली. सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्स पद्धतीही संपुष्टात आली. ४९ कोटी रु. वसूल भांडवलाच्या ४०० मॅनेजिंग एजन्सी संस्था, ५७५ कोटी रु. वसूल भांडवलाच्या ६१४ लिमिटेड कंपन्यांचा कारभार चालवीत होत्या.

**गॅरंटीपोटी सरकारला भुर्दंड** – सांगली पोल्ट्री को. सोसायटीने स्टेट बँक ऑफ इंडियाकडून कॅश क्रेडिट घेतले होते, त्याला महाराष्ट्र सरकारची हमी होती. सोसायटीने हप्ते आणि व्याज बँकेस न दिल्यामुळे सरकारने बँकेस १९६९ अखेर ३,१५,१४४ रु. भरले.

**पिलाई बँकेच्या ठेवीदारांना सहावा डिव्हिडंड** — डिसेंबर, १९६० मध्ये लिक्विडेशनमध्ये गेलेल्या पिलाई सेंट्रल बँकेच्या ठेवीदारांना प्रत्येक रुपयास ३ पैसे असा सहावा डिव्हिडंड जाहीर झाला आहे. लिक्विडेशनच्या वेळी बँकेच्या २५ शाखा होत्या व तिच्याकडे ८·६ कोटी रु. च्या ठेवी होत्या. ह्यापूर्वी, १९६२ मध्ये प्रत्येक ठेवीदाराला कायद्याप्रमाणे २५० रु. मिळाले होते. त्यानंतरचा डिव्हिडंड १२ पैसे, ६ पैसे आणि ३ पैसे दराचा होता.

**कर्जवसुलीच्या नेटाचा उत्पादनावर परिणाम (!)** १९६९–७० मध्ये सहकारी पतपेढ्यांची कर्जवसुली विशेष नेटाने झाली. थकबाकीदारांना हायब्रीड बी आणि खते उधारीवर दिली नाहीत, त्यामुळे खरीप हायब्रीड ज्वारीखालील क्षेत्र १२·३ लक्ष एकरांवरून ७·७ लक्ष एकरांवर उतरले.

**बनावट पोस्टकार्डे**—स्वतःची पोस्टकार्डे छापून विकण्याचा धंदा उघडकीस आला आहे. उत्तर प्रदेशातील अमरोहा ह्या खेडेगावातील टपाल खात्याबाहेरच्या तिकीट-विक्रेत्यांच्या लक्षात ही भामटेगिरी आली. काही घरांवर छापा घातला, त्यातून १,९५,००० बनावट पोस्टकार्डे जप्त करण्यात आली.

**टेलिफोनसाठी क्यू**–३०सप्टेंबर, १९६९च्या आकड्यांप्रमाणे, एकूण ४,५०,००० लोकांचे टेलिफोनसाठी अर्ज शिल्लक आहेत.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १५ एप्रिल, १९७०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## बँकांनी राष्ट्रीयीकरणानंतर ६०९ नव्या शाखा उघडल्या

देशातील १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून ह्या बँकांनी आपल्या शाखा वाढविण्यावर भर दिलेला दिसून येत आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरण १९६९ च्या जुलै महिन्यात झाले. तेव्हापासून ३१ जानेवारी, १९७० पर्यंतच्या सहा महिन्यांपेक्षा थोड्या अधिक काळात त्यांनी ६०९ नव्या शाखा स्थापन केल्या आहेत. त्यातही एक गोष्ट महत्त्वाची आहे. नव्या शाखांपैकी ५० टक्के शाखा ज्या ठिकाणी बँकांची सोय नव्हती अशा ठिकाणी काढण्यात आल्या आहेत, ही बाब अर्थपूर्ण म्हणावी लागेल. १९६९ सालच्या पहिल्या सहामाहीत ह्याच बँकांनी ४८४ नव्या शाखा उघडल्या होत्या हेहि ह्या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रीयीकरण झाले त्या वेळीही ग्रामीण भागात त्यांच्या शाखा नव्हत्या असे नाही. परंतु त्यांचे प्रमाण थोडे होते. त्यावेळी त्यांच्या एकूण शाखांपैकी १६·८ टक्के शाखाच ग्रामीण भागांत होत्या. राष्ट्रीयीकरण झाल्यापासून १९६९ च्या अखेरीपर्यंत ही टक्केवारी २० टक्क्यापर्यंत वाढली आहे १९७० साली मोठ्या बँकांनी १,३७० नव्या शाखा उघडण्याचा कार्यक्रम आखला आहे. त्यापैकी १,१८६ शाखा ज्या ठिकाणी बँकेची सोय नाही अशा ठिकाणी काढण्यात येणार आहेत. गेल्या वर्षापेक्षा हा आकडा जवळ जवळ दुप्पट आहे. नवीन शाखांच्या संकल्पित आकड्यांपैकी १,३०० शाखा राष्ट्रीयीकरण झालेल्या १४ बँका व स्टेट बँक ऑफ इंडिया आणि तिच्या उपसंघटना ह्यांनी म्हणजे बँकांमधील सार्वजनिक मालकीच्या विभागाने काढण्याचे ठरविले आहे.

---

## गिरण्या ताब्यात घेतल्यामुळे ६४ हजारांना काम

नॅशनल टेक्सटाइल कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. एस. आर. वसावडा ह्यांनी पत्रकारांशी बोलताना अशी माहिती सांगितली की कॉर्पोरेशनने सर्व देशात मिळून २१ आजारी कापड गिरण्या ताब्यात घेतल्या आहेत. त्यामुळे ६४ हजार कापड कामगारांना पुन्हा रोजगारीवर घेणे शक्य झाले आहे. कॉर्पोरेशनच्या स्थापनेला नुकतेच एक वर्ष होत आहे. त्या वर्षात त्याने नऊ गिरण्या चालविण्यासाठी ताब्यात घेतल्या. त्यापूर्वी १२ कापड गिरण्या सरकारने आपल्या ताब्यात घेतलेल्या होत्या. देशातील कापड गिरण्यांची एकूण संख्या ६५० आहे. त्यांपैकी ४० गिरण्या अजूनही बंद आहेत. त्यांपैकी १९ गिरण्या आज कित्येक वर्षे बंद असून त्यांची यंत्रसामग्री गंजून निकामी झालेली आहे. ह्या बाबतीत एक चौकशी कमिटी नेमण्यात आली आहे. कापड गिरण्यांपैकी किती गिरण्या चालू आर्थिक वर्षात चालू करता येण्यासारख्या आहेत ह्याबद्दल, कमिटीने अहवाल सादर करावयाचा आहे. कॉर्पोरेशनने ताब्यात घेतलेल्या बहुतेक गिरण्या जुन्या पुराण्या होत्या. सुमारे दोन वर्षांच्या अवधीत त्यांत संपूर्ण नवीन यंत्रसामग्री बसवावी लागणार आहे. गेल्या ५ वर्षात देशात नवीन कापड गिरण्या निघालेल्या नाहीत. कारण, उद्योगपतींची अशी भावना झाली आहे की, ह्या धंद्यातील उत्पन्न परवडण्याइतके पुरेसे येत नाही. ही परिस्थिति अशीच चालू राहिली तर कॉर्पोरेशनला स्वतःच नव्या गिरण्या उभारण्याचे काम हाती घ्यावे लागण्याची शक्यता आहे. ताब्यात घेतलेल्या गिरण्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी येत्या ४ वर्षात १०·५ कोटी रुपये खर्च करण्यात येतील.

---

## व्यापारी बँकांतील ठेवींवरील व्याजाचे नवे दर

( १ एप्रिल, १९७० पासून अंमलात )

५० कोटी रु. पेक्षा जास्त ठेवी असलेल्या शेड्यूल्ड व्यापारी बँका आणि परदेशात स्थापन झालेल्या बँका ह्यांनी २ ते ३ वर्षे मुदतीच्या ठेवींवर ५¾% ऐवजी ६% दराने व्याज द्यावयाचे आहे. ३ ते ५ वर्षे मुदतीच्या ठेवींवर ६% ऐवजी ६½% व्याज द्यावयाचे आहे. ५ वर्षांपेक्षा ज्यास्त मुदतीच्या ठेवींवर ६½ व्याज दिले जात असे; आता ५ ते ६ वर्षे मुदतीच्या ठेवींवर ६¾% आणि ६ वर्षांपेक्षा ज्यास्त मुदतीच्या ठेवींवर ७% व्याज द्यावयाचे आहे.

( १ ) २५ ते ५० कोटी रु. च्या, ( २ ) १० ते २५ कोटी रु. च्या आणि १० कोटी रु. पेक्षा लहान ठेवींच्या बँकांना वरील दरापेक्षा अनुक्रमे ⅛%, ¼% आणि ½% अधिक व्याज देण्यास परवानगी आहे.

---

**लष्करी तळाची अखेर—** सुएझ कालव्याच्या पूर्वेकडील आपले लष्करी तळ रद्द करून तेथील सैन्य काढून घेण्याचा निर्णय ब्रिटनने घेतलेला आहे. त्या निर्णयास अनुसरून मलेशिआमधील एक मोठा लष्करी तळ त्या सरकारच्या स्वाधीन करण्यात आला. ह्या तळाचा व्याप १,००० एकरांवर पसरलेला होता. त्याभोवती २,२०० एकरांचे जंगल होते. तेथे जंगलयुद्धाचे शिक्षण देण्यात येत असे.

---

## व्यवस्थापकीय क्षेत्रातील नेतृत्व

### संस्था आणि सेवकवर्ग ह्यांच्यातील अभिन्नत्व हीच यशस्वी नेतृत्वाची कसोटी

(डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणे येथे डॉ. प्र. चिं. शेजवलकर, उपप्राचार्य, बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, ह्यांनी चौथ्या भोपटकर स्मृतिदिनानिमित्त केलेल्या भाषणाचा सारांश)

आजकालच्या बदलत्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिवर्तनामुळे औद्योगिक व व्यापारी क्षेत्रातील धुरीणत्व पतकरणाऱ्यांचे नेतृत्व शास्त्रशुद्ध आणि ठोस असावयास हवे. तंत्रविज्ञान आणि शास्त्र यांमध्ये नेत्रदीपक प्रगती झाल्यामुळे, स्पर्धेचे क्षेत्र विस्तृत झाल्यामुळे आणि व्यक्तिशः व सामुदायिकरीत्या सेवकवर्ग संघटित व जागृत झाल्यामुळे, परंपरागत समजुतींवर आधारलेल्या कल्पना व तत्त्वे उराशी बाळगून शासन आणि व्यवस्थापन करणे आता यापुढे जमणार नाही. व्यवस्थापनात संघटनेला, तसेच नियोजनाला व नियंत्रणांना महत्त्व आहे हे खरे, परंतु नियोजनाच्या आणि काटेकोर नियंत्रणांच्या चौकटीत सेवकवर्गाची काम करण्याची तयारी कोंडून ठेवता येत नाही. सेवकवर्गास आपल्या संघटनेचा आराखडा, त्यातील नियम व पथ्ये, कार्यपद्धती आणि कामे करण्याची तंत्रे समजली पाहिजेत, मान्य झाली पाहिजेत व त्यांनी ती आपणहून स्वीकारली पाहिजेत. शेवटी केवळ यंत्रे काम करीत नाहीत. सेवकवर्गाची कंपनीविषयींची आपुलकी, आस्था, आत्मीयता, हीच प्रगती घडवीत असते.

सेवक म्हटला की तो काम टाळणार, पगारासाठी कामाच्या टोपल्या टाकणार, सत्ता, हक्क व सवलती यांसाठी झगडणार, ही समजूत चुकीची आहे हे डग्लस मॅकग्रेगर यांनी दीर्घ संशोधनानंतर सिद्ध करून दाखविले आहे. सर्वसाधारण व्यक्तीस आहार, निद्रा, करमणूक यांइतकेच कामही प्रिय असते. तो आपणहून कामाची जबाबदारी शोधत असतो. ती जबाबदारी नीट पार पाडली की त्याला फार समाधान वाटते. आपल्या गुणांचा अशा रीतीने योग्य वापर व्हावा असे त्याला मनापासून वाटते. पण त्यासाठी योग्य ती वातावरणनिर्मिती संस्थेत व्हावयास पाहिजे. मुळात तो कामच करणार नाही अशा अविश्वासाने तयार केलेले नियम, कार्यपद्धती व बंधने कमी केली पाहिजेत. सेवकास योग्य ते काम व्यवस्थित करण्याचे समाधान मिळाले की तो स्वतःहूनच स्वतःवर नियम व बंधने लादून घेईल. त्यासाठी कामाबरोबरच अधिकाराचे व सत्तेचे नीट विभाजन किंवा वाटप झाले पाहिजे. काम नीट समजावून दिले व विश्वास टाकला, चुकांची फक्त पुनरावृत्ती होणार नाही एवढी काळजी घेतली की, सत्ता सेवकवर्गात वाटून दिल्यामुळे काहीही धोका निर्माण होत नाही. आपण जबाबदाऱ्या टाकतो, पण सत्ता मात्र देत नाही; कामे सोपवितो, पण मानमरातबाच्या वेळी मात्र स्वतःच पुढे होतो.

सेवकवर्गाची संस्थेत काम करण्याची मानसिक तयारी व प्रबळ इच्छाशक्ती निर्माण होण्यासाठी लागणाऱ्या सर्व घटकांचा चालकांनी विचार केला पाहिजे. मनुष्यस्वभावानुसार प्रत्येकाला संस्थेत योग्य तो मान, दर्जा, अधिकार, सुखसोयी व सवलती तर हव्या असतातच. परंतु कामाचे चीज केले जावे, गुणगौरव व्हावा, आपल्याला विश्वासात घेतले जावे, एकूण कामाचा, आपल्याला मिळालेल्या कामाशी काय संबंध आहे तो समजावून सांगितला जावा, अधिकाऱ्यांनी प्रसंगानुसार वैयक्तिक संबंध सलोख्याचे व स्नेहाचे वाटतील असे वागावे, याही गोष्टींची सेवकांच्या मनांत अपेक्षा असते. मोठ्या संघटनांमध्ये कामही गुंतागुंतीचे होत जाते व मग किस्येकदा व्यक्तिनिरपेक्ष शासनव्यवस्था विविध थरांवरील सेवकवर्गात विचारांचे सुसंवादित्व व सौहार्द ठेवीत नाहीं. हुकूम, नोटिसा, परिपत्रके, इशारे, अहवाल इत्यादींच्या घेटोळ्यात व घाईगर्दीत बोलताना व लिहिताना वापरले जाणारे शब्द अनेकदा गैरसमज, घोटाळे, शंका, भीती, संशय, नाराजी, राग, निर्माण करतात. याबाबतीत फार जपायला हवे.

संस्थेतील सेवकवर्गास आपल्या स्वतःच्या गरजा, आशा व ध्येय आणि कंपनीच्या गरजा व ध्येय जेव्हा एकच आहेत असे वाटू लागेल तेव्हा खऱ्या अर्थाने सुसंवादित्व व सेवकांची काम करण्याची मानसिक तयारी निर्माण झाली असे म्हणता येते. संस्थेत व सेवकात जेव्हा असे अभिन्नत्व निर्माण होते तेव्हाच संस्थेच्या यशाला खरी सुरवात होते. हा परमोच्च बिंदू गाठणे हीच यशस्वी नेतृत्वाची खरी कसोटी आहे.

### "आम्हाला पति-मुले सांभाळणारी बनवू नका"

'दि लेडीज होम जर्नल' हे स्त्रियांचे जगातील सर्वात मोठे मासिक आहे. सुमारे १०० आक्रमक स्त्रियांनी त्या अमेरिकन मासिकाच्या संपादकीय कचेरीत जाऊन गोंधळ माजविला. "आपल्या पतीला आणि मुलांना सुखी ठेवणे एवढेच स्त्रियांचे कार्य आहे" असे आपल्या ६८ लक्ष वर्गणीदारांना प्रत्येक अंकातील लेखांच्या द्वारा सांगणारे मासिक आजच्या स्त्रियांना कमीपणा आणणारा अपमानास्पद प्रचार करीत आहे, अशी ह्या घेराववाल्या स्त्रियांची तक्रार होती.

---

### नशीबवान मित्र

दोन मित्र आपआपल्या पत्नींच्या गुणदोषांची चर्चा करीत होते.

पहिला मित्र : "दर रात्री मला स्वप्न पडतं, की माझं लग्न एका लक्षाधीशाशी झालं आहे," असं माझी पत्नी म्हणते.

दुसरा मित्र : तू फार भशीबवान आहेस! माझ्या बायकोला तर दिवसाच तसं वाटतं!

---

## भारतीय सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक
### 'एच एम व्ही.' कंपनीचे
### "मानवी सुखनिर्मितीचा आमचा उद्योग"

दि ग्रामोफोन कंपनी ऑफ इंडियाने पुणे येथे, 'दि इंडस्ट्री ऑफ ह्यूमन हॅपिनेस' ह्या नावाने एक प्रदर्शन भरविले होते. त्याच्या व्यवस्थेसाठी कंपनीच्या विक्री-वितरण विभागाचे डेप्युटी मॅनेजर श्री. के. एन. सोहोनी हे मुद्दाम आले होते. ह्या ग्रामोफोन कंपनीचे (भारतात हिज मास्टर्स व्हॉइसच्या संक्षिप्त नावाने—'एच एम व्ही'—ती ओळखली जाते) भारतातील सांस्कृतिक जीवनातील महत्त्वपूर्ण स्थान दिग्दर्शित करणे हा ह्या प्रदर्शनाचा मुख्य हेतू होता. ग्रामोफोन कंपनी ऑफ इंडिया ही इलेक्ट्रिकल अँड म्युझिकल इंडस्ट्रीज लि. (ई एम आय) ची सबसिडिअरी कंपनी आहे.

'ई एम आय.' ची स्थापना ग्रेट ब्रिटनमध्ये १९३१ साली ग्रामोफोन कं. लि. आणि कोलंबिया ग्रामोफोन कं. लि. ह्यांच्या एकत्रीकरणातून झाली. ग्रामोफोनच्या रेकॉर्ड्सची निर्मिती आणि विक्री एवढेच प्रारंभी ती करीत असे. आता ती अद्ययावत इलेक्ट्रॉनिक्सच्या उत्पादनातही अग्रेसर बनली आहे. त्यात संरक्षणाला लागणाऱ्या विविध प्रकारच्या उपकरणांचा समावेश होतो. ई एम आय ही करमणुकीच्या साधनांच्या क्षेत्रात ग्रेट ब्रिटनमध्ये सर्वांत मोठी कंपनी असून सबंध जगातील कंपन्यांतही तिचा अनुक्रम फार वरचा आहे. तिच्या व्यवहार-क्षेत्राची व्याप्ती प्रचंड आहे. सिनेमा, कलाकारांच्या एजन्सीज, बॉल रूम्स, थिएटरे, संगीत प्रकाशन, पशुसंग्रहालय, ह्यांचा त्यात समावेश आहे. असोसिएटेड ब्रिटिश पिक्चर कॉर्पोरेशन ही सिनेमागृहांच्या साखळीची प्रख्यात कंपनी ईएमआय च्या मालकीची आहे. त्यातच एलस्ट्री फिल्म स्टुडिओज, टेम्स टेलिव्हिजन लि. ह्यांचाही त्या मालकीत समावेश आहे. ग्रामोफोन रेकॉर्ड्सचे उत्पादन आणि वितरण करणारी ती जगातील सर्वांत मोठी कंपनी आहे. तिच्या जगभर पसरलेल्या १३७ सबसिडिअरी कंपन्या आहेत. तिचे संशोधनखाते अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ग्रामोफोन कंपनी ऑफ इंडिया लि. ने गेल्या ७० वर्षांत भारतातील सांस्कृतिक जीवनास मोलाचा हातभार लावला आहे. तिचे उत्पादनकेंद्र आणि मुख्य कचेरी डमडम (कलकत्ता) येथे असून कलकत्ता, मुंबई, दिल्ली, मद्रास, गोहत्ती आणि कानपूर येथे रेकॉर्डिंग स्टुडिओ व वितरणकेंद्रे आहेत. इतर कित्येक राज्यांच्या राजधान्यांतही अशीच केंद्रे लवकरच उघडण्यात येणार आहेत.

ग्रामोफोन रेकॉर्ड्सच्या जागतिक बाजारपेठेचा विचार केला तर त्यात १०० कोटी रेकॉर्ड्सची गणती होते आणि त्या एका मागाहून एक लावल्या तर ४०,००० वर्षे एकसारख्या त्या वाजत राहतील! त्यांचे ग्राहक कुठे आहेत, त्यांच्या आवडीनिवडी कशा बदलत आहेत, त्यांच्या मागणीप्रमाणे पुरवठा कसा करावयाचा, ही कंपनीच्या जागतिक विक्री-व्यवस्थेची प्रमुख अंगे आहेत. जागतिक बाजारपेठेपैकी ५० % रेकॉर्ड्स एकट्या अमेरिकेत खपतात. ३० % रेकॉर्ड्संचा खप युरोपात होतो. म्हणूनच, ई एम आय ने २८ देशांतून आपले रेकॉर्ड कंपन्यांचे जाळे पसरविले आहे. भाषा, आवड, अभिमान, उपलब्धता ह्यामुळे पूर्वी प्रत्येक देशात तेथील रेकॉर्ड्सच खपत. अभिजात संगीत मात्र नेहमीच आंतरराष्ट्रीय राहिले आहे. आता मात्र संगीताचे जग असे तुटक राहिलेले नाही. उदाहरणार्थ, रविशंकरच्या रेकॉर्ड्स अमेरिकेत आणि इतर देशांत आयात होणाऱ्या रेकॉर्ड्समध्ये अग्रेसर आहेत.

भारतातील शेकडो भाषांमुळे रेकॉर्ड्सच्या निर्मिती-विक्रीचा प्रश्न विशेष अवघड आहे. एच एम व्ही ४० भाषांतून रेकॉर्ड्स तयार करून विकते. त्यात विभागीय संगीताप्रमाणे रविशंकर, अलि अकबर, विलायतखान, बिस्मिल्लाखान, इत्यादींच्या कलाकृतींचाही समावेश होतो. फिल्मी संगीताच्या रेकॉर्ड्सना भारतात विशेष मागणी असते. पाश्चात्य संगीताचा भारतातील खप आश्चर्यकारक मोठा आहे. एच एम व्ही कंपनीची रेकॉर्ड्सची निर्गतही मोठ्या प्रमाणावर आहे. भारतातील राहणीचे मान वाढत आहे, त्याचा फायदा घेण्यास कंपनी सुसज्ज आहे. नामवंत कवी, गायक आणि मुत्सद्दी — टागोर, गांधी, नेहरू— ह्यांच्या रेकॉर्ड्सनी कंपनीला भारताच्या सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य घटक बनविले आहे.'

एच एम व्हीत सुमारे दोन हजार कर्मचारी रात्र आणि दिवसपाळीला काम करतात. ध्वनिमुद्रिकेच्या निर्मितीला आवश्यक असणाऱ्या सुट्या भागांपैकी ९५ टक्के सुटे भाग आता स्वदेशातच तयार होतात. ध्वनिमुद्रिकांच्या विक्रीतून आता १ कोट, ३० लक्ष रुपयाचे परकीय चलन आपल्याला मिळते.

अशा या संस्थेने मराठी संगीतासाठी काय केले हें श्री. बापू वाटवे ह्यांनी 'तरूण भारत' मध्ये तपशीलवार सांगितले आहे. गेल्या ५० वर्षांहून अधिक काळ एच एम व्ही मराठी गीतांचे ध्वनिमुद्रण करीत आहे. त्या काळातील कृष्णराव शेंडे, कृष्णराव गोरे, पंढरपूरकरबुवा, केशवराव भोसले, शंकरराव सरनाईक, विसुभाऊ भडकमकर, बालगंधर्व, मा. दीनानाथ, यांसारख्या कलावंतांचे गाणे या ध्वनिमुद्रिकांनी इतकी वर्षे जतन करून ठेवले आहे.

नाट्यगीतांबरोबर परंपरागत लोकसंगीत, स्वातंत्र्य वीर सावरकरांसारख्या तेजस्वी नेत्यांची ओजस्वी गीतरचना, चालू आणि भावी काळासाठी या ध्वनिमुद्रिकांनी जपून ठेवली आहेत.

जेव्हा आकाशवाणीचा जन्मही झाला नव्हता त्या काळात संगीताच्या प्रसाराचे काम ध्वनिमुद्रिकाच करीत होत्या. आकाशवाणी १९२७ मध्ये अस्तित्वात आली. याचा सरळ अर्थ असा की लोकरंजनाचे कार्य २६-२७ वर्षे ध्वनिमुद्रिकाच अगोदर करीत होत्या. कलावंताला प्रसिद्धी देण्याचेही मोठेच काम ध्वनिमुद्रिकांनी त्या काळात विशेष बजावले.

पूर्वीच्या नाट्यगीतांनी रसिक मनावर किती विलक्षण मोहिनी घातली आहे याचा प्रत्यय आजही येतो. 'सौभद्रमधील' 'वद जाऊ कुणाला शरण', 'किती सांगू तुला,' 'शाकुंतल'मधील 'कामना तळमळसी,' 'मृच्छकटिक' मधील 'रजनीनाथ हा नभी उगवला', 'माडीवरी चल ग गडे', 'संशय कल्लोळ'मधील 'संशय कां मनी आला', 'मानापमानमधील 'चंद्रिका ही जणू', 'दे हाता शरणागता' या गीतांना इतक्या वर्षांचा काळ लोटला तरी सतत मागणी आहे. प्रभातच्या 'संत तुकाराम' मधील अभंगांना, विशेषतः 'आधी बीज एकले'ला, अद्याप मागणी येतच असते.

लीला लिमये यांच्या 'रमला कुठे ग कान्हा' आणि जी. एन. जोशी यांच्या 'डोळे हे जुल्मी गडे' या गाण्यांनी एके काळी तुफान लोकप्रियता संपादन केली होती. लता मंगेशकर यांच्या 'गंगा यमुना डोळ्यात उभ्या का?' आणि आशा भोसले यांच्या 'पंढरीनाथा झडकरी आता' या ध्वनिमुद्रिकांनी मराठी गीतांत तर उच्चांक प्रस्थापित केला. पन्नास हजारांच्यावर या ध्वनिमुद्रिका खपल्या यावरून ही गाणी ऐकण्याचे वेड लक्षात येते. एखाद्या ध्वनिमुद्रिकेला किती अफाट मागणी येऊ शकते याचे अलीकडचे ताजे उदाहरण सांगायचे झाले तर लता मंगेशकर व हेमंतकुमार यांचे एका मराठी कोळीगीताचे सांगावे लागेल. पं. भीमसेन जोशी, हिराबाई बडोदेकर, जितेंद्र अभिषेकी, राम मराठे, कुमार गंधर्व, पं. जसराज, यांसारख्या शास्त्रीय संगीतात आघाडीवर असलेल्या कलावंतांच्या ध्वनिमुद्रिकांना तर नित्य मागणी आहे.

एच् एम् व्ही ने आजतागायत शे-दीडशे प्रकारची अंदाजे वीस हजार मराठी गीते ध्वनिमुद्रित केली आहेत. आता एल्. पी. (लाँग प्ले), ई. पी. (एक्स्टेंडेड प्ले) या पद्धतीच्या ध्वनिमुद्रिका निघू लागल्यापासून २२ मिनिटांचे एक गाणे ऐकून बैठकीचा आनंद श्रोत्याला मिळू शकतो. एका एल्. पी. वर ६ गाणी व ई. पी. वर दोन गाणी मुद्रित होतात.

---

**झिजलेल्या नाण्यांमुळे तोटा** — झिजलेली नाणी व्यवहारातून काढून घेतल्यामुळे भारत सरकारला गेल्या वर्षी २० कोटी रुपयांची घस सोसावी लागली. ह्या नाण्यांची दर्शनी किंमत आणि त्यांच्यामधील धातूंची किंमत ह्यांत १९ कोटी, ६७ लाख, ९७ हजार रुपयांचा फरक होता.

**तिबेटी मुलांसाठी हिप्पींचा कार्यक्रम** — खाटमांडू जवळच्या गावी तिबेटी मुलांना व बेकारांना मदत करण्यासाठी निरनिराळ्या देशांतील हिप्पी तरुणांनी एक जत्रा भरविली होती. ह्या हिप्पी तरुणांत २० देशांतील तरुण होते. सुमारे १,५०० हिप्पी तरुणांनी २ हजार वर्षापूर्वीच्या एका बुद्ध देवालयात सतार आणि गिटार ह्यांच्या वादनांचा कार्यक्रम सादर केला व मदत जमविली.

---


**THE BELGAUM BANK LIMITED**

**Estd. 1930**

SCHEDULED BANK


*Regd. Office* : 659-60, Raviwar Peth, Belgaum

Share Capital : Rs. Over 8 Lakhs
Reserves : Rs. Over 8½ Lakhs
Deposits : Rs. 5 Crores & 75 Lakhs

39 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT — *General Manager.*
K. B. KIRTIKAR — *Chairman.*






**GADRE BROTHERS**
**ENGINEERS & FOUNDERS**
MADHAVNAGAR (S. Rly.)
Phone : 318 "Sangli.
Gram : 'SEWA Madhavnagar

## THE BELGAUM BANK LIMITED

**659-60, Raviwar Peth, BELGAUM**

**Speech of the Chairman,**

**Shri. K. B. Kirtikar**

**(At the 40th Annual General Meeting of the shareholders held on 30th March, 1970)**

"I welcome you to this 40th Annual General meeting of the shareholders. I take it that, you all have gone through the Annual Report and the audited balancesheet for the year ended 1969. You must have been glad to observe the all round progress made by the Bank. I take this opportunity to show my appreciation and thank the entire staff for their co-operation.

"The budget for 1970-71 presented by the Union Prime Minister is unique in some ways. It is for the first time in these twenty-two years that the more priviledged classes of our country have been called upon to bear their proportionate share of burden in the Governmental expenditure in a more adequate way than hitherto. I am certain that they will rise to the occasion and meet their share gracefully.

"Inspite of several timely measures taken by the Reserve Bank and also by the Goverment of India, the price level has been moving up; leading to distressing stress in the life of common man in our economy. The only way now left to the Government to check this rise is not only to pass laws, but take drastic and deterrent actions against those who are responsible for this unethical rise in prices. It cannot be left to the mere academic question of demand and supply, but Government's active and stringent interest and action, as this is the only remedy to curb this price rise.

"I am glad to state we are a Bank that has been by and large serving the Rural areas in the past, as well as, at present and it has also been our practice to finance the small entrepreneur, in Industry, Trade and Agriculture. We are, therefore, glad to claim that we have been so to say, the pioneers in financing the smallest of the small units of our community.

"We, however, sometimes get a little disturbed when the bigger banks in our country are allowed to open branches in small towns like ours. It is not quite correct to say that the opening of such branches by big banks lends to a healthy trend in banking activities. In actual experience it is not proving the ideal. The big banks with their resources, and other factors are not the healthy compititors of small units. The Reserve Bank, which is the Beacon of Banking in our country, will do well to take this fact into consideration, while granting permission to big banks to open branches in such areas. The big banks should certainly go into rural areas where there are no small banks, but they should not be allowed to open branches in small towns like ours where are adequate banking facilities and the services of the State Bank of India are available for business, if any."

---

### न्यायमूर्तींचे पगार वाढविण्याचा विचार

भारत सरकार हायकोर्टातील आणि सर्वोच्च कोर्टातील न्यायाधीशांचे पगार दरमहा ५०० रुपयांनी वाढविण्याचा विचार करीत आहे. त्याशिवाय त्यांना अधिक सोयीसवलती उपलब्ध करून देण्याचेही घाटत आहे. न्यायाधीशांचे काम करण्यास हुषार व लायक व्यक्ती पुढे याव्या म्हणून ह्या विचाराला चालना मिळाली आहे. न्यायाधीशांच्या वेतनात सुधारणा करण्यासाठी घटना दुरुस्त करावी लागणार असल्याने ह्यासबंधी लोकसभेतील विरोधी पक्षांच्या पुढाऱ्यांशी विचार-विनिमय करण्यात येत आहे. चालू वर्ष संपण्यापूर्वी अनेक न्यायाधीश सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांच्या जागा भरून काढण्यासाठी लायक माणसे मिळणे कठीण जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनीं ह्या बाबतीत सरकारने लवकर निर्णय घ्यावा असा आग्रह धरलेला आहे. हायकोर्टात काम करणाऱ्या न्यायमूर्तींचे सेवानिवृत्तीचे वय ६२ ऐवजी ६५ करण्याचा आणि सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचे हे वय ६५ वरून ६८ पर्यंत वाढविण्याचाही विचार चालू आहे. त्यामुळे न्यायाधीशांच्या जागांविषयी अधिक आकर्षण निर्माण होईल असा अंदाज आहे. न्यायमूर्तींच्या वेतनाबाबत सध्या अमलात असलेल्या तरतुदींप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशाला मासिक ५ हजार रुपये पगार मिळतो. इतर न्यायाधीशांना दरमहा ४ हजार रुपये पगार मिळतो. हायकोर्टाच्या मुख्य न्यायाधीशाला दरमहा ४ हजार रुपये वेतन मिळते आणि इतर न्यायाधीशांना दरमहा ३,५०० रुपये वेतन मिळते. सध्या कामावर असणारे न्यायाधीश नोकरीच्या परिस्थितीविषयी असंतुष्ट आहेत.

---

रेडिओ लायसेन्सची वाढती संख्या – डिसेंबर, १९६९ अखेर नव्याने दिलेल्या किंवा नूतनीकरण केलेल्या रेडिओ लायसेन्सची संख्या १,०५,००,५७८ एवढी होती आणि त्यापासून १२·५३ कोटी रु. उत्पन्न सरकारला मिळाले. स्वातंत्र्य-प्राप्तीपूर्वी फक्त २,७५,००० रेडिओ लायसेन्स चालू होते. १९६९ अखेर १२,३०३ टेलिव्हिजन लायसेन्स चालू आहेत.

साधूंनी मारहाण टाळण्यासाठी दाढी करावी—साधू मुले पळवितात ह्या चुकीच्या कल्पनेने कित्येक साधूंना लोकांच्याकडून मारहाण केली जाते. तेव्हा साधूंनी दाढी करीत जावे किंवा त्यांना ओळखपत्रे देण्यात यावी, अशी एक सूचना करण्यात आली आहे.

---


पाणी... निसर्गाचें वरदान
वर्षाऋतूच्या आगमनाबरोबर सहस्रधारांनीं पाऊस येतो आणि सर्व भूमि जलमय होऊन जाते. पण ओहोळ, नाले, नद्या यांतून हे पाणी वाहून गेल्यावर किंवा ते जमिनींत जिरून गेल्यावर पिके, कारखाने, शहरे आणि ग्रामीणवस्ती यांच्या पाणी पुरवठ्याचा यक्षप्रश्न पुढे उभा राहातो.
पाऊस फक्त वर्षातून एकदाच पडतो, पण
किर्लोस्कर पंप
पाहिजे तेथें
पाहिजे तेव्हा
पाहिजे तेवढा
अखंड पाणीपुरवठा करतात
छोट्या बागायती, मोठ्या जलसिंचन योजना, कारखाने, ग्रामीण व शहरी पाणी पुरवठा अशा योजनांसाठीं लागणाऱ्या पंपाबाबत आमचे अेन्जिनिअर्स तुमच्या योजना अभ्यासून योग्य त्या पंपाची शिफारस करून तांत्रिक सल्ला विनामूल्य देतील. तुमच्या सविस्तर योजना कळवा.
प्रत्येक विशिष्ट गरजेसाठी स्वतंत्र किर्लोस्कर पंप
आणि प्रत्येक किर्लोस्कर पंप म्हणजे अनेक गरजांची पूर्ति !
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
STUSA-KM 2471

## सर्कस कामगारांची व कलाकारांची दीनवाणी परिस्थिती

भारत सरकारच्या मजूरमंडळाने सर्कसमध्ये काम करणाऱ्या कलाकारांच्या व कामगारांच्या नोकरीच्या परिस्थितीची पाहणी करणारा अहवाल अलीकडेच प्रसिद्ध केला आहे. हिंदी सर्कसमधून कलाकार म्हणून कामे करणारे लोक जगातील अशा इतर देशांच्या कलाकारांइतकेच वाकबगार आहेत; सर्कसच्या चालकांनी खेळात सुधारणा केली तर पाश्चिमात्य देशांतून हिंदी सर्कस फार लोकप्रिय होईल असा निष्कर्ष अहवालात काढण्यात आला आहे. पाहणीतील माहितीप्रमाणे ह्या व्यवसायात सुमारे ५½ हजार लोक गुंतलेले आहेत. त्यांपैकी ४५ टक्के कायम नोकरीत आहेत आणि हंगामी नोकरीत आहेत. इतर शिक्षणार्थी आहेत. कलाकारात ज्याना ५ वर्षांपेक्षा कमी अनुभव आहे अशांची टक्केवारी ८८ आहे. कलाकार सोडून इतर नोकरांत ९१ टक्के लोक ५ वर्षांपेक्षा कमी अनुभवाचे आहेत. एकूण नोकरात स्त्रियांचे प्रमाण १२ टक्के आहे. मुलांना कामावर ठेवण्याची पद्धत सरसहा प्रचलित आहे. त्यांची टक्केवारी ९ आहे. सर्कसमधील काम शिकण्यासाठी राहिलेल्या लोकांपैकी ३५ टक्के लोकांना काहीच मेहनताना देण्यात येत नाही किंवा त्यांना नोकरीची कोणत्याही प्रकारची शाश्वतीही नसते. पालक आणि चालक ह्यांच्यात वाटाघाटी होऊनच वेतन ठरविण्याची प्रथा आहे. वेतन ठरविण्याच्या काळाबाबत कोठलाही कायदा लागू होत नाही. ४० टक्के नोकरांना वेळेवर पगार मिळत नाही. नोकरांना भत्ते देण्याची पद्धत नाही. सर्कसमधील नोकरांच्या कामाबद्दल कोठलाही कायदा नाही किंवा त्यांच्या कामाच्या वेळाही निश्चित नाहीत.

त्यांना साप्ताहिक सुटी कधीच नसते. फक्त ११ सर्कस कंपन्यात पगारी रजा देण्याची वहिवाट आहे. सर्कसमधील लोकांचे आरोग्य राखण्यासाठी जवळजवळ काहीच करण्यात येत नाही. काही थोड्या सर्कशी सोडल्या तर नोकरांना देहधर्म पाळण्याच्या सोयीही करून देण्यात येत नाहीत. कोणत्याच कंपनीत दवाखाना अगर औषधपाण्याच्या सोयी नाहीत. सर्कसच्या व्यवसायात अपघाताचे प्रमाण बरेच असते. परंतु फक्त ४ टक्के कंपन्यांतून प्राथमिक उपचाराची पेटी आढळून आली. सर्कसमध्ये काम करणाऱ्या लोकांच्या आयुष्याचा विमा उतरण्यास आयुर्विमा कॉर्पोरेशन तयार होत नाही. बाळंतपणाचा भत्ता, सेवानिवृत्तिवेतन अगर ग्रॅच्युइटी ह्यांची व्यवस्था अर्थातच नाही. सामाजिक सुरक्षिततेचा लाभ करून देणाऱ्या कायद्यांपैकी फक्त दोन त्यांना लागू आहेत. एक एम्प्लॉईज प्रॉव्हिडंड फंड ॲक्ट आणि दुसरा वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ॲक्ट. असे असले तरी बहुतेक कंपन्या ह्या कायद्यांकडे दुर्लक्षच करतात आणि तरीही हिंदी सर्कशी आफ्रिका, पश्चिम आशिआ व आग्नेय आशिआ ह्या भूभागात लोकप्रिय झाल्या आहेत. लहान–मोठ्या हिंदी सर्कस कंपन्यांची संख्या सुमारे २०० असावी आणि त्यात १० हजार लोक गुंतलेले असावे असा एक अंदाज आहे. पण, पाहणी करणाऱ्या मंडळाला ५३ कंपन्या व त्यात काम करणारे ५,३३४ लोक ह्यांचीच मोजदाद करता आली. सर्कसमधील कलाकारांत मुख्य भरणा केरळमधील तेलीचेरी भागातून झालेला आहे. कलाकारांतील ३८ टक्के लोकांची मातृभाषा मल्याळी आहे. सर्कसचा धंदा 'भटक्या' स्वरूपाचा असल्यामुळे त्यामधील नोकरांना मजूर कायद्यांचा फारसा लाभ मिळालेला नाही.

---

## योग्यांच्या अद्भूत सामर्थ्याच्या कसोट्या

ऑल इंडिआ इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स ही संघटना गेली १० वर्षे यौगिक सामर्थ्याच्या शास्त्रीय कसोट्या घेत आहे. योगसमाधीत असताना शरीराच्या व्यापारावर काय परिणाम होतात ते अभ्यासण्यासाठी संघटनेने ५० वर्षे वयाच्या एका योग्यावर प्रयोग केले आहेत. एका हवाबंद धातूच्या पेटीत त्याला समाधी घेण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे तो ६ तास पर्यंत समाधी अवस्थेत पेटीत बसला. ह्या काळात त्याच्या शरीरव्यापाराच्या संवेदना इलेक्ट्रॉनिक साधनांनी बाहेर पाठविण्यात येऊन त्यांची चिकित्सा करण्यात आली. त्यावरून असे दिसून आले की समाधी स्थितीत असताना शरीरातील चयापचयाची क्रिया ५० टक्क्यांइतकी मंदावते. परंतु योग्याच्या मेंदूची जाणीवेची शक्ती मात्र नाहीशी होत नाही. ह्याचा अर्थ असा की, झोप आणि समाधी ह्या दोन अवस्था वेगळ्या आहेत. कारण, झोपेत माणसाची जाणीवच तात्पुरती लुप्त होते. यौगिक समाधीत असताना योग्याचा मेंदू जागा असला तरी बाह्य जगातून येणारा उजेड अगर ध्वनी ह्या आघातांची दखल मात्र तो घेत नाही. पेटीत समाधीत असताना हळूहळू आत कर्बवायूचे प्रमाण वाढत जाते. परंतु ह्या साठलेल्या कर्बवायूचा परिणाम समाधिस्त योग्यावर होत नाही किंवा फारच कमी होत असावा असे दिसते. तथापि, कर्बवायूबद्दलची ही सहिष्णुता प्रत्येक योग्याची सारखीच असेल असे मात्र नाही. कारण हाच योगी समाधिस्थ अवस्थेत ९ वर्षांपूर्वी ९ तासपर्यंत पेटीत बसू शकला होता. ह्यावेळी मात्र ६ तासांनंतर त्याला श्वासोच्छवासाची अडचण पडू लागली.

---

**पोलादाचा जपानी राक्षसी कारखाना**—जपानमधील दोन मोठ्या पोलाद कारखान्यांचे एकत्रीकरण नुकतेच झाले आहे. यावाटा आणि फुजी स्टील ह्या कंपन्यांनी आता निप्पॉन स्टील कॉर्पोरेशन हे नवे नाव धारण केले आहे. यु. स्टेटस् स्टील कॉर्पोरेशनचे वार्षिक उत्पादन ३·१५ कोटी टन आहे, त्या खालोखाल ३ कोटी टन उत्पादनाच्या ह्या जपानी कंपनीचा अनुक्रम लागेल. ब्रिटिश स्टील कॉर्पोरेशनचे उत्पादन २·४४ कोटी टन आहे.

---

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १४,६२,२०,००० |
| ठेवी | रु. | ७४,५७,३६,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,४२,०९,१२,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

## सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.

* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार- सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

तारेचा पत्ता
" मॉर्गेज "

मुख्य कार्यालय दूरध्वनी २६१४९७
उपकार्यालय क्र.१ दूरध्वनी २६०३०६
उपकार्यालय क्र.२ दूरध्वनी २९०००६

## दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६८ अखेर बँकेचे भागभांडवल ५ कोटी २८ लक्ष रु., गंगाजळी ३० लक्ष रु., ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २१ कोटी रु. व येणे कर्ज ६७ कोटी रु. आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

गो. प. भावे
कार्यकारी संचालक

## महाराष्ट्रातील नामवंत बँक

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना - १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

सातारा

रजिस्टर्ड ऑफिस : १४३-१४६, भवानी पेठ, सातारा शहर.

आपल्या ४३ शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात तत्पर.

खेळते भांडवल : १२ कोटींचे वर
ठेवी : ११·७५ कोटींचे वर

ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.
तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.
कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.

वि. श्री. दामले
बी. ए., एम्. कॉम्., एलएल्. बी., सी. ए. आय्आय्. बी. चेअरमन

### ट्रॅन्झिस्टर रेडिओंचा सपाटेबंद प्रसार

जनमानसापर्यंत पोचविण्याचे अत्यंत प्रभावी साधन म्हणजे रेडिओ. त्यातही ट्रॅन्झिस्टर रेडिओचा शोध लागल्यापासून ह्या साधनाच्या उपयुक्ततेची कक्षा खूपच वाढली आहे. भारतात १९६९ अखेर १ कोटीपेक्षा अधिक ट्रॅन्झिस्टर्स वापरात होते. त्यानंतरही ह्या रेडिओंची संख्या झपाट्याने वाढत आहे. मध्यवर्ती सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्याने केलेल्या अंदाजाप्रमाणे ४ थ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस देशातील ८९ टक्के लोक रेडिओच्या श्रवणकक्षेत येतील. शिवाय, देशाच्या निरनिराळ्या भागांत कार्यक्रम प्रक्षेपित करणारी नवी केंद्रे स्थापन करण्यात येत आहेत. त्यांतील काही तर डोंगराळ व दुर्गम भागांत असतील. १९७४ अखेर रेडिओ केंद्रांची संख्या ६६ वरून १०४ पर्यंत जाईल. त्यांपैकी ७५ केंद्रे स्वतःचे कार्यक्रम प्रक्षेपित करतील आणि बाकीची पुनर्प्रक्षेपण करतील. अखिल भारतीय रेडिओच्या कार्यक्रमात देशांतर्गत प्रक्षेपणातील बराच मोठा वेळ फिल्मी गाण्यांना दिलेला असतो. शास्त्रीय संगीताला १६ टक्के वेळ मिळतो. लोकसंगीताला ३ टक्क्यांपेक्षाही कमी वेळ मिळतो. फिल्मी संगीत सोडून इतर हलक्याफुलक्या संगीताला १२ टक्के वेळ मिळतो. पाश्चिमात्य संगीताला २ टक्के वेळ देण्यात येतो. वृत्तप्रक्षेपणाला २५ टक्के वेळ मिळतो. भाषणांना ८ टक्के आणि ग्रामीण कार्यक्रमांना ७ टक्के वेळ मिळतो. बहुतेक कार्यक्रम स्टुडिओमध्येच तयार केलेले असतात. परंतु लवकरच अनेक कार्यक्रम प्रत्यक्ष जागेवरच तयार केले जातील. विविध ठिकाणी होणाऱ्या घटनांचे व प्रसंगांचे ध्वनिचित्रण करण्यासाठी टेपरेकॉर्डर्सची बरीच मदत घेण्यात येणार आहे.

---

### अमेरिकेतील विवाहबाह्य संतती

अमेरिकेच्या आरोग्य खात्याने केलेल्या नमुना-पाहणीप्रमाणे १९६४ ते १९६६ च्या दरम्यान जन्मलेल्या पहिल्या मुलांपैकी एकतृतीयांश मुले विवाहपूर्व संबंधातून झालेली होती. प्रत्येक सात मुलांपैकी एक मूल अशा संबंधापासून झालेले असावे असा अंदाज आहे. घाईने लग्ने उरकण्यात आल्यामुळे अशी बरीच मुले जन्माच्या वेळी विवाहित जोडप्यांची मुले झाली. अमेरिकेत वयात आलेली मुले व मुली काही काल एकमेकांचा सहवास करतात. स्त्री-पुरुष संबंधाबाबत समाजाच्या वृत्तीत गेल्या काही वर्षांत बराच फरक पडला आहे. त्यामुळे विवाहबाह्य संततीचे प्रमाण दिसते त्यापेक्षा बरेच अधिक असण्याची शक्यता आहे. ज्या अमेरिकन कुटुंबांचे उत्पन्न सालीना ३ हजार डॉलर्सपेक्षा कमी होते अशा कमी उत्पन्नाच्या गटात विवाहबाह्य संततीचे प्रमाण अधिक आढळते.

---

**आयुर्मर्यादेच्या वाढीबरोबरच धोका —** आशिआतील विकसनशील देशांतील लोकांची आयुर्मर्यादा वाढत चालली आहे. पण त्याबरोबरच कॅन्सरच्या रोगाचा धोकाही वाढत चालला आहे. हा रोग मुख्यतः ४५ वर्षांच्या पुढील लोकांना होतो. भारतात आता आयुर्मर्यादा ५० च्या पुढे गेली आहे. कॅन्सरचा रोग असलेल्या हिंदी स्त्रियांपैकी ६० टक्के स्त्रियांना गर्भाशयाचा कॅन्सर झालेला असतो.

**सोन्याच्या उत्पादनात घट —** १९६८ साली भारतामधील सोन्याचे उत्पादन ३,५८८ किलोग्रॅम झाले होते. १९६९ साली ते घटून ३,१९४ किलोग्रॅम झाले. कोलार येथील सोन्याच्या खाणीतून कमी खनिज काढण्यात आले, आणि खनिजातील सोनेही कमी प्रमाणात शुद्ध करता आले. त्यामुळे उत्पन्नात ही घट झाली आहे.

**महारोग्यांना संततिबंदी नाही —** श्रीमती शकुंतलाबाई परांजपे ह्यांनी गंभीर स्वरूपाचा महारोग, क्षय अथवा वेडेपण असलेल्यांवर संतती न होऊ देणारी शस्त्रक्रिया सक्तीने करण्यात यावी असे त्यांचे बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठवावे अशी राज्यसभेत सूचना केली. ती १३५ विरुद्ध १३ मतांनी नामंजूर झाली. हे रोग असाध्य राहिलेले नाहीत, हा मुद्दा बहुतेक विरोधकांनी मांडला.

**पोस्टकार्डे विमानाने जाणार नाहीत —** पोस्टकार्डे विमानाने न पाठविण्याचा सरकारने निर्णय केला आहे. पोस्टकार्डासाठी सरकारला १४ पैसे खर्च येतो, पण त्याची किंमत १० पैसे आहे. पोस्टकार्डापायीच सरकारला ४ कोटी रु. नुकसान येते. पोस्टकार्डे विमानाऐवजी आगगाड्यातूनच पाठविण्यात येऊ लागली, म्हणजे व्यापारी कंपन्या त्यांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर करणार नाहीत आणि सरकारची बचत होईल. इनलँड लेटरची किंमत पाकिटाइतकीच, म्हणजे २० पैसे करण्याची कल्पना सरकारच्या विचाराधीन आहे.

**सोनगड कागद गिरणीचा विक्रम —** सोनगडच्या सेंट्रल पल्प मिल्सने आपल्या उत्पादनाच्या पहिल्याच वर्षी ६० लक्ष रुपयांची परदेशी चलनाची कमाई केली, असे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. बाबूराव पारखे ह्यांनी सोनगड येथे पत्रकार परिषदेत सांगितले. डांग आणि राजपिपला ह्या क्षेत्रांतील बांबूचा उपयोग गिरणीत केला जातो.

**भाक्रा धरणाचे आयुष्य —** भाक्रा धरण ५०० वर्षे टिकेल असा मूळ अंदाज होता. आताच्या अंदाजाप्रमाणे ते २५० वर्षे टिकेल. त्याचे आयुष्य १५० वर्षांनी कमी झाले तरी २५० वर्षांचे आयुष्य सुद्धा खूप मोठे आहे असे सरकारचे म्हणणे आहे.

**सायकलींची निर्गत —** सायकलींच्या निर्यातीने भारताला मार्च, १९६९ ते डिसेंबर १९६९ ह्या मुदतीत ३·५ कोटी रु. मिळवून दिले. आफ्रिकेतील आणि आग्नेय आशिआतील देशांप्रमाणेच अमेरिकाही त्यांचे मोठे गिऱ्हाईक आहे.

---

# तुम्हांला इंग्रजी येत नसेल तरी चिंता नाही. महाराष्ट्र बँकेत प्रादेशिक भाषेतूनही व्यवहार केला जातो



तुमचा लाखो रुपयांचा व्यवहार इंग्रजीवाचून अडणार नाहीं
महाराष्ट्र बँक म्हणजे तुमची भाषा समजणारी बँक तुमच्या जिव्हाळ्याची बँक!

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफीसः ११७७, बुधवार पेठ, पुणे-२.

6961


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)